दि.०१ डिसेंबर, २०२५

# नागरिकांची सनद

नियंत्रक, वैध मापन शास्त्र, महाराष्ट्र राज्य, मुंबई
फाऊंटन  टेलिकॉम इमारत  क्र.१,७  वा मजला, हुतात्मा स्मारक चौक,
एम.जी.रोड, मुंबई. - ०१
दुरध्वनी  क्र.022-22621972/22621978

# प्रस्तावना

ग्राहकांच्या हितांचे रक्षण करण्यासाठी विविध कायदे व नियम अस्तित्वात आहेत. ग्राहकानें वस्तू खरेदी करण्यासाठी जे मूल्य दिले आहे त्याचे बदल्यात योग्य वजनात वा मापात वस्तू मिळणे हा सर्व ग्राहकाचा कायदेशीर हक्क आहे. अधिनियम व नियमांतर्गत ग्राहकांच्या हक्कांच्या रक्षणासाठी व हित जपण्यासाठी वैध मापनशास्त्र यंत्रणा कार्यरत आहे.

वैध मापनशास्त्र यंत्रणा ही सेवा देणारी शासकीय यंत्रणा आहे. या यंत्रणेमार्फत अंमलबजावणी करण्यात येणारे अधिनियम व नियमांतर्गत दिले जाणारे विविध परवाने, नोंदणी व प्रमाणपत्र विषयकच्या सर्व सेवा पुरविण्याची कालमर्यादा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी व व्दितीय अपिलीय अधिकारी तसेच तक्रार निवारणाबाबतच्या विषयीचे संक्षिप्त मार्गदर्शन नागरी सनदीमध्ये उपलब्ध करुन दिले आहे. या सर्व बाबींची जनतेस माहिती झाल्यास यंत्रणा अधिकाधिक लोकाभिमुख व पारदर्शी होईल तसेच यंत्रणेची जनमानसातील प्रतिमा उंचावण्यास निश्चित मदत होईल याची मला खात्री आहे.

(चंद्रकांत डांगे) भाप्रसे)
प्र.नियंत्रक वैध मापन शास्त्र,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

## विषयसूची


| अ क्र. (१) | विषय (२) | पृष्ठ.क्र. (३) |
| --- | --- | --- |
| १. | यंत्रणे मार्फत देण्यात येणाऱ्या सेवा | ३ ते ५ |
| २. | यंत्रणेमार्फत देण्यात येणा-या सेवा, सेवा पुरविण्याची कालमर्यादा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी व द्वितीय अपिलीय अधिकारी इत्यादींचा तपशील | ६ ते ८ |
| ३. | वापरात नसलेले वजन वा माप यांच्याबाबत करावयाच्या अर्जाचा नमुना | ९ |
| ४. | अपिल अर्जाचा नमुना (अनुसुची १३) | १० |
| ५. | वैध मापन शास्त्र यंत्रणेतील कार्यालयांचे पत्ते व दूरध्वनी क्रमांक | ११ ते १४ |

# यंत्रणेमार्फत करण्यात येणारी कार्ये

वैध मापनशास्त्र यंत्रणेमार्फत कायदा व त्याखालील नियम यांची अंमलबजावणी करुन ग्राहकांच्या हितांचे रक्षण केले जाते. यामध्ये प्रामुख्याने वजनात किंवा मापात माल/वस्तू कमी देणे, छापील किंमतीपेक्षा जास्त दराने आवेष्टित वस्तूंची विक्री करणे, छापील किंमतीत खाडाखोड करुन ग्राहकांची फसवणूक करणे इत्यादींबाबतीत कार्यवाही करुन ग्राहकांचे हित जपले जाते. या संदर्भातील अधिनियम व नियम पुढीलप्रमाणे आहेत.

१. वैध मापन शास्त्र अधिनियम, २००९
२. वैध मापन शास्त्र (आवेष्टित वस्तू) नियम, २०११
३. वैध मापन शास्त्र (सर्वसाधारण) नियम, २०११
४. महाराष्ट्र वैध मापन शास्त्र (अमंलबजावणी) नियम, २०११

वरील अधिनियम व त्याखालील नियमांची अंमलबजावणी करत असताना प्रामुख्याने खालील कार्ये या यंत्रणेमार्फत केली जातात.

१. **वजन वा मापांची पडताळणी व मुद्रांकन-**

वजन माप उपयोगकर्त्याकडील

(अ) वजने, क्षमता मापे, लांबी मापे, टेप, दांडी तराजू आणि फलक यंत्र इत्यादींची २४ महिन्यातून एकदा-

(ब) साठवणूक टाकी पाच वर्षांतून एकदा व

(क) इतर सर्व वजने मापे १२ महिन्यातून एकदा पडताळणी व मुद्रांकन करुन घेणे कायद्याने बंधनकारक आहे.

या पडताळणीसाठी उपयोगकर्त्याने आपली वजने, मापे संबंधित निरीक्षकाकडे सादर करावयाची असतात. अश्या वजन वा मापामध्ये दुरूस्ती करणे आवश्यक असल्यास परवानाधारक दुरूस्तकांमार्फत दुरूस्ती नंतर सादर करता येऊ शकतात ग्रामीण पातळीवर यासाठी निरीक्षक पूर्वनिर्धारित कालावधीमध्ये शिबीराचे आयोजन करतात.

वरील सर्व पडताळणी व मुद्रांकन अर्ज ऑनलाईन करण्यासाठीची सुविधा यंत्रणेच्या http://vaidhmapan.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

वजने व मापे उपयोगकर्त्याने वापरात असलेल्या वजन वा मापाच्या पडताळणी अथवा फेरपडताळणी व मुद्रांकनाकरीता संबंधित अधिका-याकडे ऑनलाईन स्वरुपात अर्ज करावायाचा असतो. अर्जाच्या छाननीनंतर उपयोगकर्त्यास त्याच्या विनंतीनुसार कार्यालयात अथवा कार्यालयाबाहेर (उपयोगकर्त्याच्या ठिकाणी) पडताळणी व मुद्रांकनाकरीता संबंधित अधिकारी ऑनलाईन प्रणालीव्दारे तारीख व वेळ कळवितो. त्यानंतर दिलेल्या तारखेस व वेळेस उपस्थित राहून उपयोगकर्त्याकडील वजन वा मापाची नियमानुसार पडताळणी व मुद्रांकन करुन ऑनलाईन प्रणालीव्दारे यंत्रणेच्या संकेतस्थळावर पडताळणी व मुद्रांकन प्रमाणपत्र प्रदान करतो.

२. वजन माप विषयक परवाने-

उपरोक्त अधिनियम/नियमातील तरतुदींनुसार विहीत परवाना असल्याखेरीज कोणासही वजन वा मापांचे उत्पादन, दुरुस्ती व विक्री करता येत नाही. यासाठी खालील परवान्यांची आवश्यकता असते.

(अ) उत्पादक परवाना देणे/नूतनीकरण-

कोणतेही वजन वा माप, ज्यामध्ये तोलन वा मापन उपकरणांचाही समावेश होतो, यांचे उत्पादन करण्यासाठी उत्पादक परवाना घेणे आवश्यक आहे. सदर परवाना नियंत्रक, वैध मापन शास्त्र कार्यालयाकडून देण्यात येतो. तसेच या परवान्याचे नूतनीकरणही याच कार्यालयाकडून करण्यात येते.

(ब) दुरूस्ती परवाना देणे-

कोणतेही वजन वा माप यांची दुरूस्ती करण्यासाठी दुरूस्तक परवाना घेणे आवश्यक आहे. दुरुस्तीचे कार्यक्षेत्र एकापेक्षा जास्त प्रादेशिक विभाग असल्यास सदर परवाना नियंत्रक, वैध मापन शास्त्र कार्यलयाकडून देण्यात येतो. दुरूस्तीचे कार्यक्षेत्र फक्त प्रादेशिक विभाग असल्यास परवाना संबंधित प्रादेशिक विभागाचे सह नियंत्रक यांचेकडून देण्यात येतो.

(क) दुरूस्ती परवाना नूतनीकरण-

नियंत्रक कार्यालयाने दिलेल्या फक्त दुरूस्ती परवान्याचे नूतनीकरण सदर परवानाधारकाची कार्यशाळा ज्या प्रादेशिक विभागात आहे त्या प्रादेशिक विभागाचे सह नियंत्रक यांचेकडून केले जाते. प्रादेशिक विभाग सह नियंत्रक यांनी दिलेल्या परवान्याचे नूतनीकरण सदर परवानाधारकाची कार्यशाळा ज्या जिल्हयामध्ये आहे, त्या जिल्हयाचे उप नियंत्रक यांचेकडून केले जाते.

(ड) विक्री परवाना देणे/ नूतनीकरण-

कोणतेही वजन वा माप यांची विक्री करण्यासाठी विक्री परवाना घेणे आवश्यक आहे. यासाठी अर्जदाराचे नोंदणीकृत कार्यालय ज्या जिल्हयात आहे त्या जिल्ह्याचे उप नियंत्रक यांचेकडून विक्री परवाना देण्यात येतो, तसेच या परवान्याचे नूतनीकरणही त्यांचेकडूनच करण्यात येते.

वरील सर्व परवान्यासाठी/परवाना नूतनीकरणासाठी करावयाच्या अर्जाचे नमुने महाराष्ट्र वैध मापनशास्त्र (अंमलबजावणी) नियम, २०११ मध्ये विहीत करण्यात आलेले असून या सर्व सेवांसाठी ऑनलाईन पध्दतीने यंत्रणेच्या http://vaidhmapan.maharashtra.gov.in या वेबसाईटवर अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध आहे.

इच्छूक व्यक्तींनी परवाना मिळविण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांकडे ऑनलाईन स्वरुपात अर्ज विहीत शुल्कासह करावयाचा असतो. अर्जाच्या छाननी नंतर जर इच्छूक व्यक्ती परवाना मिळण्यास पात्र आढळली तर त्यास परवाना दिला जातो. वरील सर्व परवाने सुरवातीस एक कॅलेंडर वर्षासाठी देण्यात येतात. परवान्यांचे नूतनीकरण करण्यासाठीचा अर्ज परवान्याची मुदत संपण्यापूर्वी ३० दिवस अगोदर करावा लागतो. अन्यथा त्यास नियमीत शुल्कसह ५० टक्के अतिरिक्त शुल्क आकारुन नियंत्रकांच्या मान्यतेने परवान्याच्या विहीत मुदतीत नूतनीकरण करण्यासाठी ऑनलाईन स्वरुपात अर्ज करता येतो, तथापि, एक महिन्याची वाढीव मुदत संपेपर्यंत परवानाधारकाने नुतनीकरण्यासाठी ऑनलाईन स्वरुपात अर्ज केला नाही तर त्याचा परवाना रद्द होतो.

(इ) आवेष्टित वस्तू उत्पादक/आवेष्टक/आयातदार नोंदणी-

आवेष्टित वस्तूंचे उत्पादन /आवेष्टन/आयात करणाऱ्या सर्वांना याबाबतची नोंदणी करणे नियमानुसार बंधनकारक आहे. यासाठी आयातदार, उत्पादक वा आवेष्टक यांची नोदंणी नियंत्रक कार्यालयात ऑनलाईन स्वरुपात करण्यात येते. अर्ज करण्याची सुविधा यंत्रणेच्या http://vaidhmapan.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

(फ) नामनिर्देशित व्यक्तीची नोंदणी करणे.

आवेष्टीत वस्तू उत्पादक/आवेष्टक/आयातदार यांना कायदयातील तरतूदीनुसार आस्थापनेतील जबाबदार व्यक्तीची नामनिर्देशित म्हणून नोंदणी ऑनलाईन स्वरुपात नियंत्रक कार्यालयास करण्यात येते. अर्ज करण्याची सुविधा यंत्रणेच्या यंत्रणेच्या http://vaidhmapan.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

(ग) आवेष्टित वस्तू उत्पादक/आवेष्टक/आयातदार यांच्या संक्षिप्त पत्त्याची नोंदणी करणे-

आवेष्टित वस्तू उत्पादक/आवेष्टक/आयातदार यांच्या संक्षिप्त पत्याची नोंदणी ऑनलाईन स्वरुपात नियंत्रक कार्यालयात करण्यात येते.

**३. वजन वा माप आणि आवेष्टित वस्तू नियम विषयक तरतुदींचा भंग-**

खोटया वजनमापांचा वापर, वजनात कमी माल देणे, अधिक मालाची मागणी करणे, आवेष्टित वस्तुंची छापिल किंमतीपेक्षा जास्त दराने विक्री करणे, त्यावरील मूळ किंमतीमध्ये खाडाखोड करणे, आवेष्टनावर घोषित निव्वळ वजन वा मापापेक्षा माल कमी आढळणे, आवेष्टित वस्तूवर आवश्यक उदघोषणा न छापणे इत्यादी बाबींमध्ये ग्राहकांची व सर्वसाधारण जनतेची फसवणूक होत असल्याचे आढळून आल्यास वा वैध मापनशास्त्र विषयक तरतुदींचा भंग होत असल्यास निरीक्षक संबंधितांविरुध्द कारवाई करतात. ग्राहकास व सर्वसाधारण जनतेस या बाबी आढळून आल्यास अथवा याबाबतीत तक्रारी असल्यास ग्राहक संबधित कार्यक्षेत्राच्या अधिकाऱ्याकडे लेखी तक्रार नोंदवू शकतो. त्याचप्रमाणे तक्रार नोंदविण्यासाठी यंत्रणेने स्वतंत्र भ्रमणध्वनी ९८६९६९१६६६ हा व्हॉट्सॲप नंबर उपलब्ध करुन दिलेला आहे. याव्यतिरिक्त माहितीसाठी व तक्रार नोंदविण्यासाठी dclmms_complaints@yahoo.com हा स्वतंत्र ई-मेल पत्ता ग्राहकांसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. जिल्हापातळीवर तक्रार नोंदविण्यासाठी जिल्हा उप नियंत्रक यांचे दूरध्वनी क्रमांक संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. तक्रारी प्राप्त झाल्यावर संबंधित कार्यालयाकडून त्यांची त्वरित दखल घेतली जाते व तरतुदींचा भंग झाला असल्यास अपराध्यांविरुध्द खटला नोंदविण्यात येतो. अधिनियमातील व नियमातील तरतुदींनुसार प्रशमन करता येत असलेले खटले संबंधिताने विनंती केल्यास तडजोडीने मिटविण्यासाठी आदेशित प्रशमन रक्कम शासन जमा करण्याच्या अटीस अधिन राहून प्रशमित करण्यात येतात किंवा सदर खटले न्यायालयात दाखल केले जातात. त्याचप्रमाणे याबाबत विनंतीनुसार तक्रारदारासही कळविण्यात येते.

## यंत्रणेमार्फत देण्यात येणा-या सेवा, सेवा पुरविण्याची कालमर्यादा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी व द्वितीय अपिलीय अधिकारी इत्यादींचा तपशील

| अ.क्र. | लोकसेवेचे नाव | सेवा पुरविण्याची कालमर्यादा (कामाचे दिवस) | ज्याच्याकडून सेवा पुरविली जाईल तो पद निर्देशित अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी | द्वितीय अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | वजन वा मापे उत्पादकाकरिता परवाना देणे. | ३५ दिवस | नियंत्रक, वैध मापनशास्त्र | सह सचिव/उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग. | प्रधान सचिव/ सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग. |
| २ | वजन वा मापे उत्पादकाच्या परवान्याचे नुतनीकरण | स्वयंचलित-नुतनीकरण | नियंत्रक, वैध मापनशास्त्र | सह सचिव/उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग. | प्रधान सचिव/ सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग. |
| ३ | वजन वा मापे उत्पादक परवान्यामध्ये फेरफार | ३५ दिवस | नियंत्रक, वैध मापनशास्त्र | सह सचिव/उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग. | प्रधान सचिव/ सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग. |
| ४ | वजन वा मापे दुरुस्तीकरिता परवाना देणे | ३५ दिवस | १)नियंत्रक, वैध मापनशास्त्र<br>२)प्रादेशिक सहनियंत्रक, वैध मापनशास्त्र | १) सह सचिव/उप सचिव, अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग.<br>२) नियंत्रक, वैध मापन शास्त्र | (१) प्रधान सचिव/ सचिव, अन्न, नागरी, पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग.<br>(२) सह सचिव/उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग. |
| ५ | वजन वा मापे दुरुस्ती परवाना नुतनीकरण | स्वयंचलित-नुतनीकरण | १) नियंत्रक, वैध मापनशास्त्र<br>२) प्रादेशिक सह नियंत्रक, वैध मापन शास्त्र<br>३) जिल्हा उप नियंत्रक, वैध मापनशास्त्र | १) सह सचिव/उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग.<br>२) नियंत्रक, वैध मापन शास्त्र<br>३) प्रादेशिक सह नियंत्रक, वैध मापन शास्त्र | १) प्रधान सचिव/ सचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग.<br>२) सह सचिव/उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग.<br>३) नियंत्रक, वैध मापनशास्त्र |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६ | वजन वा मापे दुरुस्ती परवान्यामध्ये फेरफार | ३५ दिवस | १) नियंत्रक, वैध मापन शास्त्र<br>२) प्रादेशिक सह नियंत्रक, वैध मापन शास्त्र | १) सह सचिव/उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग.<br>२) नियंत्रक, वैध मापन शास्त्र | १) प्रधान सचिव/ सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग.<br>२) सह सचिव/उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग. |
| ७ | वजन वा मापे विक्रेता परवाना देणे | ३५ दिवस | १)नियंत्रक, वैध मापनशास्त्र<br>२)प्रादेशिक सह नियंत्रक, वैध मापनशास्त्र<br>३)जिल्हा उप नियंत्रक, वैध मापनशास्त्र | १) सह सचिव/उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग.<br>२) नियंत्रक, वैध मापनशास्त्र<br>३) प्रादेशिक सह नियंत्रक, वैध मापन शास्त्र | १) प्रधान सचिव/ सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग.<br>२) सह सचिव/उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग.<br>३) नियंत्रक, वैध मापनशास्त्र |
| ८ | वजन वा मापे विक्रेता परवाना नुतनीकरण | स्वयंचलित-नुतनीकरण | १) नियंत्रक, वैध मापनशास्त्र<br>२) प्रादेशिक सह नियंत्रक, वैध मापनशास्त्र<br>३) जिल्हा उप नियंत्रक, वैध मापनशास्त्र | १) सह सचिव/उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग.<br>२) नियंत्रक, वैध मापनशास्त्र<br>३) प्रादेशिक सह नियंत्रक, वैध मापनशास्त्र | १)प्रधान सचिव/ सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग.<br>२)सह सचिव/उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग.<br>३)नियंत्रक, वैध मापनशास्त्र |
| ९ | वजन वा मापे विक्रेता परवान्यामध्ये फेरफार | ३५ दिवस | १)नियंत्रक, वैध मापन शास्त्र<br>२)प्रादेशिक सह नियंत्रक, वैध मापन शास्त्र<br>३)जिल्हा उपनियंत्रक, वैध मापन शास्त्र | १)सह सचिव/उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग.<br>२)नियंत्रक, वैध मापन शास्त्र<br>३) प्रादेशिक सह नियंत्रक, वैध मापन | १)प्रधान सचिव/ सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग.<br>२)सह सचिव/उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | शास्त्र | ३)नियंत्रक, वैध मापनशास्त्र |
| १० | वैध मापन शास्त्र (आवेष्टीत वस्तू) नियम, २०११ अंतर्गत आवेष्टीत वस्तुंचे उत्पादक/आवेष्टक यांची नोंदणी करणे | २५ दिवस | नियंत्रक,<br>वैध मापनशास्त्र | सह सचिव/उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग. | प्रधान सचिव/ सचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग. |
| ११ | वैध मापन शास्त्र (आवेष्टीत वस्तू) नियम, २०११ अंतर्गत आवेष्टीत वस्तुंचे उत्पादक/आवेष्टक यांच्या नोंदणीत फेरफार करणे | २५ दिवस | नियंत्रक,<br>वैध मापनशास्त्र | सह सचिव/उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग. | प्रधान सचिव/ सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग. |
| १२ | वैध मापन शास्त्र (आवेष्टीत वस्तू) नियम, २०११ अंतर्गत आवेष्टीत वस्तुंचे आयातदार यांची नोंदणी करणे | २५ दिवस | नियंत्रक,<br>वैध मापनशास्त्र | सह सचिव/उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग. | प्रधान सचिव/ सचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग. |
| १३ | वैध मापन शास्त्र (आवेष्टीत वस्तू) नियम, २०११ अंतर्गत आवेष्टीत वस्तुंचे आयातदार यांच्या नोंदणीत फेरफार करणे | २५ दिवस | नियंत्रक,<br>वैध मापनशास्त्र | सह सचिव/उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग. | प्रधान सचिव/ सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग. |
| १४ | नामनिर्देशित व्यक्तीची नोंदणी करणे | २५ दिवस | नियंत्रक,<br>वैध मापनशास्त्र | सह सचिव/उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग. | प्रधान सचिव/ सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग. |
| १५ | वैध मापन शास्त्र अधिनियम , २००९ अंतर्गत वजन वा माप यांची पडताळणी व मुद्रांकन करुन प्रमाणपत्र देणे | कार्यालयांतर्गत ५ दिवस | सहायक नियंत्रक/निरीक्षक,<br>वैध मापनशास्त्र. | जिल्हा उप नियंत्रक, वैध मापनशास्त्र | प्रादेशिक विभाग सह नियंत्रक, वैध मापनशास्त्र |
| १६ | वैध मापनशास्त्र अधिनियम, २००९ अंतर्गत वजन वा माप यांची पडताळणी व मुद्रांकन करुन प्रमाणपत्र देणे | कार्यालयाच्या बाहेर ३० दिवस | सहायक नियंत्रक/निरीक्षक,<br>वैध मापन शास्त्र. | जिल्हा उप नियंत्रक, वैध मापनशास्त्र | प्रादेशिक विभाग सह नियंत्रक, वैध मापनशास्त्र |

# वापरात नसलेल्या वजन वा माप यांच्याबाबत करावयाच्या अर्जाचा नमुना

[महाराष्ट्र वैध मापन शास्त्र (अंमलबजावणी) नियम, २०११ मधिल नियम-१५(३)]
वापरात नसलेल्या वजन वा मापाच्या संबंधातील तपशील

१. उपयोगकर्त्याचे नाव व पत्ता -
२. व्यवसायाचे स्वरुप -
३. वजन वा मापाचा प्रकार व संख्या -
५. क्षमता -
६.वर्ग -
७. मशीन अनुक्रमांक
८. मागील पडताळणी प्रमाणपत्र क्रमांक व दिनांक -
९. वापर न करण्याचे कारण

मी/आम्ही---------------------------------------------------------- (नाव व पदनाम) याद्वारे घोषित करतो की, पडताळणी व मुद्रांकन वैधतेशिवाय वजन वा मापाचा वापर करणे हा वैध मापन शास्त्र अधिनियम, २००९ व त्याखालील नियमानुसार गुन्हा आहे याची मला/आम्हाला जाणीव आहे. मी/आम्ही वरील वजन वा माप उपयोगात आणण्यापूर्वी आपल्याकडून फेरपडताळणी व मुद्रांकन करुन घेतल्याशिवाय वापर करणार नाही.

दिनांक -

उपयोगकर्त्याची स्वाक्षरी व शिक्का

# अपिल अर्जाचा नमुना

## अनुसुची -१३

## महाराष्ट्र शासन

(अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग)
वैध मापन शास्त्र यंत्रणा
वैध मापन शास्त्र अधिनियम, २००९
महाराष्ट्र वैध मापन शास्त्र (अंमलबजावणी) नियम, २०११ चा नियम २४(१)
नियंत्रक किंवा वैध मापन शास्त्र अधिकाऱ्याने दिलेल्या आदेश किंवा निर्णय या विरुध्द करावयाच्या
अपिल अर्जाचा नमुना

१. अपिलकर्त्यांचे नाव व पत्ता -

२. नियंत्रक किंवा वैध मापन शास्त्र अधिकाऱ्याने दिलेले आदेश किंवा निर्णय या विरुध्द अपिल करण्यात येत आहे त्याचा क्रमांक व दिनांक (आदेश/निर्णय प्रत जोडावी)

३. अपिलकर्ता सुणावणीसाठी स्वत: उपस्थित राहू इच्छितो वा प्राधिकृत प्रतिनिधीमार्फत सुणावणी करु इच्छितो

४. अपिलाची कारणे

ठिकाण:
दिनांक

अपिलकर्त्याची स्वाक्षरी

# वैध मापनशास्त्र यंत्रणेतील कार्यालयाचे पत्ते व दुरध्वनी क्रमांक

| अ. क्र. | कार्यालयाचे नाव | कार्यालयाचा पत्ता | दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | नियंत्रक, वैध मापनशास्त्र, महाराष्ट्र राज्य, मुंबई. | फाऊंटन टेलिकॉम बिल्डींग नं.१, ७ वा मजला, एम.जी.रोड, हुता त्मा स्मारक चौक, फोर्ट, मुंबई-४००००१. | ०२२-२२६२२०२२<br>०२२-२२६२१९६८ |
| २. | सह नियंत्रक, वैध मापनशास्त्र, मुंबई महानगर विभाग. | पुरवठा भवन, ३ रा मजला, जनरल नागेश मार्ग गांधी हॉस्पीटल जवळ, परळ मुंबई. ४०००१२. | ०२२-२४१४८४९४ |
| ३. | उप नियंत्रक, वैध मापनशास्त्र, मुंबई जिल्हा क्र.१ | पुरवठा भवन, ३ रा मजला, जनरल नागेश मार्ग गांधी हॉस्पीटल जवळ, परळ मुंबई. ४०००१२. | ०२२-२४१५६९१० |
| ४. | उप नियंत्रक, वैध मापनशास्त्र, मुंबई जिल्हा क्र.२ | पुरवठा भवन, ३ रा मजला, जनरल नागेश मार्ग गांधी हॉस्पीटल जवळ, परळ मुंबई. ४०००१२. | ०२२-२४१७१३५२ |
| ५. | उप नियंत्रक, वैध मापनशास्त्र, मुंबई जिल्हा क्र.३ | पुरवठा भवन, ३ रा मजला, जनरल नागेश मार्ग गांधी हॉस्पीटल जवळ, परळ मुंबई. ४०००१२. | ०२२-२४१२६०७६ |
| ६. | सह नियंत्रक, वैध मापनशास्त्र, कोकण विभाग. | खोली क्र.६२५, सहावा मजला, कोकण भवन, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ | ०२२-२७५७४०७४ |
| ७. | उप नियंत्रक, वैध मापनशास्त्र, ठाणे जिल्हा क्र.१ | दुसरा माळा, नियोजन भवन जिल्हाधिकारी आवार, ठाणे जिल्हा. | ०२२-२५४०९९३१ |
| ८. | उप नियंत्रक, वैध मापनशास्त्र, ठाणे जिल्हा क्र.२ | दुसरा माळा, नियोजन भवन जिल्हाधिकारी आवार, ठाणे जिल्हा. | ०२२-२५४०९९३१ |
| ९. | उप नियंत्रक, वैध मापनशास्त्र, पालघर जिल्हा | रुम नं.७, बी-बिल्डींग नवीन प्रशासकीय इमारत जिल्हाधिकारी कार्यालय आवार, कुळगाव रोड, पालघर | ०२२-२७५७४०७४ |
| १०. | उप नियंत्रक, वैध मापनशास्त्र, रायगड जिल्हा क्र.१ | १०४, प हिला मजला, सुर्यदर्शन, एलआयसी ऑफीस समोर एम.जी.रोड, पेण,जि.रायगड-४०२१०७ | ०२१४३-२५४४९८ |
| ११. | उप नियंत्रक, वैध मापनशास्त्र, रायगड जिल्हा क्र.२ | १०४, प हिला मजला, सुर्यदर्शन, एलआयसी ऑफीस समोर एम.जी.रोड, पेण,जि.रायगड-४०२१०७ | ०२१४३-२५४४९८ |

| | | | |
|---|---|---|---|
| १२. | उप नियंत्रक, वैध मापनशास्त्र, रत्नागिरी-सिंधूदुर्ग जिल्हे | दुसरा माळा, जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात, नवीन प्रशासकीय इमारत, रत्नागिरी-४१५६१२. | ०२३५२-२००८५५ |
| १३. | सह नियंत्रक, वैध मापनशास्त्र, पुणे विभाग. | भिमाशंकर वसाहत, बंगला नं.१६, येरवडा, पुणे-४११००६ | ०२०-२९९९२१२९ |
| १४. | उप नियंत्रक, वैध मापनशास्त्र, पुणे जिल्हा क्र.१ | ८९२, मझदा आईस फॅक्टरी कंपाऊंड,सिनेगॉग पथ कॅम्प, पुणे-४११००१ | ०२०-२६१३७११४ |
| १५. | उप नियंत्रक, वैध मापनशास्त्र, पुणे जिल्हा क्र.२ | माऊली निवास, केशनंद फाटा बस स्टॉप, जवळ, वाघोली, पुणे-४१२२०७ | ०२०-२९९९२१२९ |
| १६. | उप नियंत्रक, वैध मापनशास्त्र, पुणे जिल्हा क्र.३ | प्लॉट नं.१/४, सेक्टर नं.४, केंद्रिय विहार जवळ, स्पाईन रोड मोशी प्राधिकरण, मोशी ता.हवेली,जि. पुणे-४१२१०५ | ०२०-२९९९२१२९ |
| १७. | उप नियंत्रक, वैध मापनशास्त्र, पुणे जिल्हा क्र.४ | भिमाशंकर वसाहत, बंगला नं.१६, येरवडा, पुणे-४११००६ | ०२०-२९९९२१२९ |
| १८. | उप नियंत्रक, वैध मापनशास्त्र, सातारा जिल्हा | माऊली बंगला प्लॉट नं. ८ मि. नं. ३१३/३ क, दिक्षित हार्टकेअर समोर, राधिका रोड, सातारा-४१५ ००१. | ०२१६२-२३२१४३ |
| १९. | उप नियंत्रक, वैध मापनशास्त्र, सांगली जिल्हा. | मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, तळ मजला पाठीमागील बाजूस, विजयनगर सांगली-मिरज रोड वानलेसवाडी सांगली- ४१६८१५ | ०२३३-२६०००५३ |
| २०. | उप नियंत्रक, वैध मापनशास्त्र, कोल्हापूर जिल्हा | १८४५ सी वार्ड, हत्तीमहल रोड, कोल्हापूर, जिल्हा कोल्हापूर-४१६ ००२. | ०२३१-२५४२५४९ |
| २१. | उप नियंत्रक, वैध मापनशास्त्र, सोलापूर जिल्हा | ऊजनी वसाहत, अंतिम भुखंड ४१ ई, गुरुनानक नगर जवळ, सोलापूर -४१३ ००३. | ०२१७-२६०१९४९ |
| २२. | सह नियंत्रक, वैध मापनशास्त्र, छत्रपती संभाजीनगर विभाग. | प्लॉट नं.३३, एन-२,सिडको, महाजन, कॉलनी, छत्रपती संभाजीनगर | ०२४०-२९५२६५६ |
| २३. | उप नियंत्रक, वैध मापनशास्त्र, छत्रपती संभाजीनगर जिल्हा. | सिडको-७, मध्यवर्ती सु विधा इमारत, गरवारे कंपनी समोर, छत्रपती संभाजीनगर | ०२४०-२४८३८१८ |
| २४. | उप नियंत्रक, वैध मापनशास्त्र, जालना जिल्हा. | न्यु, एमआयडीसी, छत्रपती संभाजीनगर रोड, जालना-४३१ २०३. | ०२४८२-२२०७४३ |

| | | | |
|---|---|---|---|
| २५. | उप नियंत्रक, वैध मापनशास्त्र, नांदेड जिल्हा | बंदाघाट रोड वजीराबाद नांदेड-४३१ ६०१. | ०२४६२-२३३८८१ |
| २६. | उप नियंत्रक, वैध मापनशास्त्र, बीड जिल्हा. | प्रशासकीय इमारत, चांदमारी कॉलनी, धानोरा रोड, पालवण चौकाजवळ, ता.जि.बीड- | ०२४४-२२२४१७ |
| २७. | उप नियंत्रक, वैध मापनशास्त्र, परभणी- हिंगोली जिल्हा. | नखाते बिल्डींग, गव्हाणे रोड परभणी - ४३१ ४०१. | ०२४५२-२२१२५८ |
| २८. | उप नियंत्रक, वैध मापनशास्त्र, लातूर-धाराशिव जिल्हा. | जिल्हा ग्राहक तक्रारनिवारण मंच कार्यालयाच्या मागे, जुने जिल्हाधिकारी कार्यालय प रिसर, शिवाजी चौक, लातूर,जि. लातूर-४१३ ५१२. | ०२३८२-२४५२०७ |
| २९. | सह नियंत्रक, वैध मापनशास्त्र, नाशिक विभाग. | बॅरेक नंबर १६, जुनी शासकीय अस्वनी, विभागीय आयुक्त कार्यालय आवार, नाशिकरोड, नाशिक. ४२२१०१ | ०२५३-२४५५६९६ |
| ३०. | उप नियंत्रक, वैध मापनशास्त्र, नाशिक जिल्हा क्र.१ | C-१, बिल्डिंग, मेरी कॉलनी, सी. डी. ओ. मेरी हायस्कूल समोर, दिंडोरी रोड, नाशिक-४२२००४ | ०२५३-२५३१९३९ |
| ३१. | उप नियंत्रक, वैध मापनशास्त्र, नाशिक जिल्हा क्र.२ | C-१, बिल्डिंग, मेरी कॉलनी, सी. डी. ओ. मेरी हायस्कूल समोर, दिंडोरी रोड, नाशिक-४२२००४ | ०२५३-२५३१९३९ |
| ३२. | उप नियंत्रक, वैध मापनशास्त्र, अहिल्यानगर जिल्हा. | मोहमदी मस्जिद ट्रस्ट बिल्डिंग, तांबटकरलेन शहाजीरोड अहिल्यानगर ४१४००१ | ०२४१-२३४३२५३ |
| ३३. | उप नियंत्रक, वैध मापनशास्त्र, जळगाव जिल्हा. | मंडोरे मार्केट डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्केटच्या पाठीमागे जिल्हा पेठ जळगाव ४२५००१ | ०२५७-२२४११४९ |
| ३४. | उप नियंत्रक, वैध मापनशास्त्र, धुळे-नंदूरबार जिल्हे. | जुने जिल्हाधिकारी कार्यालय आवार कोषागार कार्यालयाच्या समोर धुळे ४२४००१ | ०२५६२-२३६१४९ |
| ३५. | सह नियंत्रक, वैध मापनशास्त्र, अमरावती विभाग. | आयुक्त कार्यालयाची इमारत, पहिला माळा, अमरावती-४४४६०२. | ०७२१-२६६३०८९ |
| ३६. | उप नियंत्रक, वैध मापनशास्त्र, अमरावती जिल्हा. | डॉ.बोराडे हॉस्पीटल, चपराशीपुरा, अमरावती | ०७२१-२६६३०८९ |
| ३७. | उप नियंत्रक, वैध मापनशास्त्र, यवतमाळ जिल्हा. | श्री.मोहन महाजन यांचे लक्ष्मी निवास, अभ्यंकर कन्या शाळेजवळ, पत्रकार कॉलनी रोड, यवतमाळ. | ०७२३२-२४२१५७ |

| | | | |
|---|---|---|---|
| ३८. | उप नियंत्रक, वैध मापनशास्त्र, अकोला जिल्हा. | श्री.प्रमोद लव्हाळे यांचे घर, घर नं.ए-१८, सुधीर कॉलनी, अकोला . | ०७२४-२४०१४९४ |
| ३९. | उप नियंत्रक, वैध मापनशास्त्र, बुलढाणा जिल्हा. | वानखेडे ले-आऊट, बुलढाणा. | ०७२६२-२४९२०६ |
| ४० | सह नियंत्रक, वैध मापनशास्त्र, नागपूर विभाग. | जुने सचि वालय इमारत, खोली क्रमांक ६५,सिव्हिल लाईन्स, नागपूर | ०७२१-२५४०२९२ |
| ४१. | उप नियंत्रक, वैध मापनशास्त्र, नागपूर जिल्हा क्र.१ | प्रशासकीय ईमारत क्र.ए विंग, पाचवा माळा, सिव्हिल लाईन्स, नागपूर. | ०७२१-२५४०२९२ |
| ४२ | उप नियंत्रक, वैध मापनशास्त्र, नागपूर-वर्धा ग्रामिण जिल्हा क्र.२ | प्रशासकीय ईमारत क्र.ए विंग, पाचवा माळा, सिव्हिल लाईन्स, नागपूर. | ०७२१-२५४०२९२ |
| ४३ | उप नियंत्रक, वैध मापनशास्त्र, भंडारा-गोंदिया जिल्हे. | राजगोपालाचारी वार्ड, जुने तारघराच्या मागे, भंडारा-४४१ ९०७. | ०७१८४-२५४२८५ |
| ४४ | उप नियंत्रक, वैध मापनशास्त्र, चंद्रपूर-गडचिरोली जिल्हे. | रोहीत पेट्रोलपंपाजवळ, दुर्गाजवळ रोड, तूकूम, चंद्रपूर- | ०७१७२-२५२५३९ |